नि.दि.दावा क्र.१४/२०१६

संत गजानन महाराज –वि.– अमर शर्मा

नि.क्र. १५० लगत

**<u>वादीचे सा.क्र. २ यांचा उर्वरित उलटतपास प्रतिवादीचे वकील श्री. बी. के. गांधी यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>**

६७. मला दाखविण्यात आलेल्या ९ छायाचित्रामध्ये दुकानाच्या चारही बाजुने व समोरच्या बाजुने बॅरीकेट लावण्यात आलेले आहेत जेणेकरुन भावीक तेथे जावू शकणार नाही याबाबत मी काही सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७ पासून बॅरीकेट लावण्यात आलेले आहेत व बॅरीकेट लावण्याचा उद्देश दुकानादाराने त्याचे दुकान सोडून पळून जावे असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ मध्ये दुकानादाराने बॅरीकेट काढल्यामुळे मी त्याबाबतचा पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रकरणामध्ये दुकानदाराची निर्दोष मुक्तता झालेली आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्या प्रकरणाची अपील प्रलंबीत आहे. फौजदारी प्रकरण क्र. ५३२/२०१८ मध्ये माझा पुरावा झाला होता. सन २०१८ मध्ये लावण्यात आलेले बॅरीकेट मुख्य गेटपासून तर बाहेर जाण्याच्या रस्त्यापर्यंत लावण्यात आले होते की काय हे मी सांगु शकत नाही. मी घटनास्थळावर गेलो असता मला बॅरीकेट काढलेले दिसले असे झाले होते. आता मला अपराध क्र. ५४६/२०१७ मधील माझ्या बयाणाची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली तसेच स.फौ.ख.क्र. ५३२/२०१८ मधील माझ्या पुराव्याची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. सदर प्रती उलटतपासात दाखविण्यात आल्यामुळे त्यांना **<u>नि.क्र.२५८ व २५९</u>** देण्यात येते. असे घडले होते की, मला बॅरीकेट काढल्याचे दिसून आल्यामुळे मी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रकरणात पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता. आता मला नि.क्र.२५८ व २५९ दाखविण्यात आले. त्यातील संपूर्ण मजकूर बरोबर आहे. आता नि.क्र.२५८ मधील अधोरेखांकीत भाग–अ मला वाचून दाखविला असता तो बरोबर आहे. अधोरेखांकीत भाग–अ ला **<u>नि.क्र.२६०</u>** देण्यात येते. आता नि.क्र.२५९ मधील अधोरेखांकीत भाग–अ मला वाचून दाखविला असता तो बरोबर आहे. अधोरेखांकीत भाग–अ ला **<u>नि.क्र.२६१</u>** देण्यात येते. आता नि.क्र.२५९ मधील अधोरेखांकीत भाग–अ–१ ते अ–१० मला वाचून दाखविला असता तो बरोबर आहे. अधोरेखांकीत भाग–अ–१ ते अ–१० ला संयुक्तपणे **<u>नि.क्र.२६२</u>** देण्यात येते.

६८. हे म्हणणे खरे नाही की, संस्थानची जागा शासनाने दिलेली आहे. अभिलेख

बघून संस्थानकडे जागा कशी आली हे मला सांगता येईल. संस्थानला जागा सरकारने दिली नाही याबाबत मला माहिती असल्यामुळे मी ते सांगत आहे. मला त्याबाबतची वैयक्तीक माहिती आहे. आता मला जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद शेगाव यांना दिलेल्या पत्राची छायांकीत प्रत दाखविली. त्याला **वस्तुचिन्ह–अ** देण्यात येते. मुख्याधिकारी नगर परिषद शेगाव यांनी आम्हाला पत्र दिले होते. आता मला मुख्याधिकारी, नगर परिषद शेगाव यांनी संस्थानला दिलेल्या पत्राची छायांकीत प्रत दाखविण्यात आली. सदर छायांकीत प्रतला निशाणी देण्यास वादीचा आक्षेप नसल्यामुळे सदर छायाकीत प्रतला **नि.क्र.२६३** देण्यात येते. आता मला मुख्याधिकारी, नगर परिषद शेगाव यांनी दिलेल्या दि.१०.०६.२०२५ रोजीच्या पत्राची छायांकीत प्रत दाखविण्यात आली. ते पत्र आम्हाला देण्यात आले होते. त्याला **नि.क्र.२६४** देण्यात येते. संस्थानद्वारे मुख्याधिकारी नगर परिषद शेगाव यांच्या पत्राला उत्तर देण्यात आले होते. आता मला त्या उत्तराची छायांकीत प्रत दाखविण्यात आली. त्याला **नि.क्र.२६५** देण्यात येते.

६९. दुकानदार सन १९७२–७३ पासून दुकान चालवितात की काय हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्येक दुकानादाराला भाडेपट्टा करुन देण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, भाडेपट्टा नोंदणीकृत करण्यात आला होता. आता मला दुकान १९–अ च्या भाडेपट्ट्याची प्रमाणीत केलेली प्रत दाखविण्यात आली. ती प्रमाणीत प्रत नोंदणीकृत आहे. त्यातील संपूर्ण मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.२६६** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, सर्व दुकानदारांना नि.क्र.२६६ सारखा भाडेपट्टा करुन देण्यात आलेला आहे. भाडेपट्टा करारनामे सन २०१२ पर्यंत होते. साक्षीदार आता सांगतो की, सन २०१२ पर्यंतचे करारनामे लिव्ह ॲन्ड लायसन्सचे होते. लिव्ह ॲन्ड लायसन्सचा करारनामा दि.०१.०६.२०११ पासून ३०.०४.२०१२ पर्यंत होता. सन २०११ च्या पूर्वीचे लिव्ह ॲन्ड लायसन्सचे परवाने माझ्याकडे असतील. सन २०११ च्या पूर्वीचे लिव्ह ॲन्ड लायसन्सचे करारनामे मी का दाखल केले नाही हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०११ च्या पूर्वीचे दुकानाचे करारनामे हे भाडेपट्ट्याच्या करारनामे होते. सन २०११ च्या लिव्ह ॲन्ड लायसन्सचा करारनामा करण्यापूर्वी आम्ही दुकानाचा ताबा घेतला होता. त्याची ताबेपावती करुन देण्यात आली होती. ताबेपावती माझ्याकडे आहे परंतु ती शोधावी लागेल. हे म्हणणे खरे नाही की, सन २०११ मध्ये मी दुकानाचा ताबा घेतला नव्हता. करारनाम्याची मुदत संपल्यानंतर मी ताबा घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, सन २०११ चा करारनामा करण्याच्या वेळेस मी ताबा घेतला होता. सन २०११ मध्ये ताबा घेण्याच्या पूर्वी मी भाडेकरुंना नोटीस दिल्या होत्या. त्या नोटीसा अभिलेखावर मी का दाखल केलया नाहीत

याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. मी न्यायालयामार्फत ताबा घेतला नव्हता.

प्रश्न – भाडे नियंत्रण कायद्यानुसार मुळ मालकाला भाडेकरुंच्या ताब्यात असलेल्या मालमत्तेचा ताबा घेत येत नाही?

उत्तर – त्यांनी ताबा दिला म्हणून आम्ही ताबा घेतला.

७०. हे म्हणणे खरे नाही की, भाडेकरुंचा हक्क डावलण्यासाठी आम्ही जबरदस्तीने त्याच्याकडून लिव्ह ॲन्ड लायसन्सचे करारनामे करुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तुमची दुकान खाली करुन घेवून असे भाडेकरुंना धमकावण्यात आले होते.

७१. प्रतिवादी हे आमचे लिव्ह ॲन्ड लायसन्सच्या करारानुसार परवाना धारक आहेत. परवाना धारकाची केस भाडे नियंत्रण कायद्याखाली चालते की नाही हे मी सांगु शकत नाही. दावा मिळकतीची सन २०१६ मध्ये अंदाजे किंमत एक ते दोन लाख रुपये होती. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ मध्ये प्रत्येक दुकानाची किंमत अंदाजे वीस लाख रुपये होती. हे म्हणणे खरे नाही की, दुकानदारांकडून जबरदस्तीने दुकाने खाली करुन घेण्यासाठी त्यांच्याकडून लिव्ह ॲन्ड लायसन्सचा करारनामा करुन घेण्यता आला होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दाखल केलेली केस या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना दुकानाच्या बाहेर काढण्यासाठी आम्ही प्रतिवादींचा व्यवसाय बंद केलेला आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| **(एन. डी. मेश्राम)** | **(एन. डी. मेश्राम)** |
| दिवाणी न्यायाधीश कोर्ट क्र.१, शेगांव | दिवाणी न्यायाधीश कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०५.०१.२०२६ | दि.०५.०१.२०२६ |